RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ४३] गुरुवार, मार्च ३१, २०२२/चैत्र १०, शके १९४४ [पृष्ठे २ किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ९७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मार्च, २०२२

**शुद्धिपत्रक**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१ (एल.बी. ४६)-यु/रस्ते-८.—ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक खाक्षेस-२०१६/प्र.क्र. २५१ (एल.बी.४६)-यु/रस्ते-८, दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) द्वारे, सार्वजनिक प्रयोजन असलेल्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग [राज्य महामार्ग (विशेष) क्र.२] (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग " असा करण्यात आला आहे) याचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी, उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली जमीन संपादनाचे घोषणापत्र प्रसिद्ध केले आहे;

आणि ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी तथा प्रशासक नवनगरे, अहमदनगर यांनी मौजे जेऊर कुंभारी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर येथील जमिनीबाबत उक्त अधिसूचनेबाबत शुद्धिपत्रक निर्गमित करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) व पोट-कलम (३) आणि कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीच्या रकाना (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या बाबतीत,

त्या अनुसूचीच्या रकाना (३) मध्ये अधिसूचित केलेला भूमापन क्रमांक / गट क्रमांक या मध्ये दुरुस्ती करून, त्या अनुसूचीच्या रकाना (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेले भूमापन क्रमांक / गट क्रमांक हे, उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

## अनुसूची

### संपादित करावयासाठी उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन

**तालुका : कोपरगांव जिल्हा : अहमदनगर**

| अ. क्र. | अधिसूचित गाव | भूमापन क्रमांक / गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर ) | सुधारित दुरुस्ती भूमापन क्रमांक / गट क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | जेऊर कुंभारी | १८८/१ पैकी | ०.२४०० | ११८/१ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रशांत द. नवघरे,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.